पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

व्यवसाय
आपण ज्येष्ठ, सेवानिवृत्त, गृहिणी आहात का?
आपला वेळ, शिक्षण यांचा उपयोग करून नामांकित कंपनीत आपल्याला वेळेत कामाची सुवर्णसंधी!
निश्चित उत्पन्न ■ कोणतीही गुंतवणूक नाही
संपर्क : 8087459854

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २५६ वा | शुक्रवार, दि. २२ मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# कॉकरोच जनता पार्टीच्या उदयाने देशाचं राजकारण बदलणार?

## आमचे अकाऊंट हॅक कराल, बंद कराल, पण युवकांच्या मनात जो राग आहे, तो कसा बंद करणार?

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** सत्ताधारी आणि सरकारी यंत्रणांवर थेट शब्दांत हल्लाबोल केला आहे. सोशल मीडियावरील वाढत्या दबावाच्या पार्श्वभूमीवर, "आमचे अकाऊंट हॅक कराल, बंद कराल, पण लोकांच्या मनात, युवकांच्या मनात जो राग आहे, तो कसा बंद करणार?" असा जळजळीत सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

अमेरिकेत शिक्षण घेणारे अभिजीत दीपके यांनी सुरू केलेल्या कॉकरोच जनता पार्टीला सोशल मीडियात अल्पावधीच तुफान प्रतिसाद मिळाला. इन्स्टाग्रामवर सीजेपीच्या फॉलोअर्सचा आकडा तब्बल १ कोटी ४० लाखांच्या पुढे गेला आहे. त्यानंतर काही तासांपूर्वीच सीजेपीचे एक्स अकाऊंट भारतात बंद करण्यात आले आहे. दीपके यांनी लगेच कॉकरोज इज बॅक नावाने दुसरे अकाऊंट सुरू केले असून त्यावर नेटकऱ्यांच्या उड्या पडत आहेत.

अभिजीत दीपके यांनी कॉकरोज इज बॅक हे अकाऊंट सुरू करताना थेट भाजपवर पहिल्यांदाच वार केला आहे. या नव्या अकाऊंटवर आपल्याला ब्लॉक करण्यामागचे कारण असे लिहित त्यावर एक कॉकरोच भाजपचे निवडणूक चिन्ह कमळ खात असल्याचा फोटो पोस्ट करण्यात आला आहे. त्यासोबत भाजप आणि कॉकरोच जनता पार्टीचे इन्स्टाग्राम अकाऊंटवरील फॉलोअर्सची संख्याही दाखविण्यात आली आहे.

एकप्रकारे सीजेपीची लोकप्रियता चार दिवसांच वाढल्याने एक्स अकाऊंट खाते

### कॉकरोच जनता पार्टीचा सोशल मीडियावर धुमाकुळ

भारतात ब्लॉक होण्यामागे भाजपच असल्याचा आरोप दीपके यांनी या पोस्टच्या माध्यमातून केला आहे. युवकांच्या शक्तीला कमी लेखू नका, असे संदेशही दीपके यांनी या पोस्टमध्ये दिला आहे. सीजेपीचे इन्स्टाग्रामवरील फॉलोवर्स भाजपपेक्षा अधिक झाले आहेत.

दरम्यान, दीपके हे मुळचे महाराष्ट्रातील असून शिक्षणासाठी अमेरिकेत गेले आहेत. काही काळ त्यांनी आम आदमी पक्षाच्या सोशल मिडिया टीममध्येही काम केले आहे. त्यावरून त्यांच्यावर आता या पक्षासाठी काम करत असल्याचा आरोप होऊ लागला आहे. पंजाब निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपच्या मदतीनेच




हा ट्रेंड सुरू करण्यात आल्याचा आरोप होऊ लागला आहे. दीपके यांनी हे आरोप फेटाळून लावले असून त्याचा कोणत्याही पक्षाशी संबंध नसल्याचे म्हटले आहे.

**जजेसच्या अपेक्षा सेट होत आहेत**

अभिजितने सांगितले की, भारताचे चीफ जस्टिस ऑफ इंडिया (CJI) आहेत त्यांना असं का वाटलं की जे लोक सिस्टम विरुद्ध बोलतात ते कॉकरोच आणि पॅरासाईट आहेत? चीफ जस्टिस ऑफ इंडिया यांचा रोल संविधानाची रक्षा करणे आणि लोकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करणे हा आहे. त्यातलाच एक अधिकार हा 'फ्रीडम ऑफ एक्सप्रेशन' म्हणजेच बोलण्याचा अधिकार आहे. ज्यांचे काम या अधिकाराची रक्षा करणे आहे, तेच जर बोलणाऱ्यांना कॉक्रोच आणि पॅरासाईट म्हणत असतील, तर हे खूपच 'सॅड स्टेटमेंट' होतं. म्हणूनच आम्ही ही कॉकरोच जनता पार्टी सुरू केली. सुप्रीम कोर्टाचे जे जजेस असतात, त्यांना रिटायरमेंटनंतर सरकारकडून एखाद्या कमिटीचे चेअरमन बनवले जाते किंवा राज्यसभेत पाठवले जाते. याच्यामुळे जजेसच्या अपेक्षा सेट होत आहेत की मला रिटायरमेंटनंतर काहीतरी भेटेल, त्यामुळे मी सरकारसोबत गुड टर्म्सवर असलं पाहिजे.

**या मोहिमेचे राजकीय पक्षात रूपांतर होणार का?**

अभिजितने सांगितले की, नक्कीच होईल, पण आता काही सांगणं थोडं अवघड असेल. कारण ही पार्टी आम्ही काही प्लॅनिंग करून सुरू केलेली नव्हती. जर चीफ जस्टिस ऑफ इंडियांचे ते स्टेटमेंट आले नसते, तर आज मी इथे इंटरव्ह्यूला बसलो नसतो. तीन-चार दिवसांतच आमच्याकडे 1 कोटी 10 लाख लोक इन्स्टाग्रामवर जोडले गेले आहेत. इतक्या लोकांशी बोलून प्लॅनिंग करणे सध्या अवघड आहे. आम्ही आधी या लोकांशी बोलू, त्यांच्याकडून इनपुट्स घेऊ की त्यांचा सध्याच्या सिस्टिमवर आणि सरकारवर एवढा राग का आहे?

**अकाऊंट हॅक करण्याचा प्रयत्न**

दीपके यांनी आपल्या खासगी आणि सीजेपीचे इन्स्टाग्राम अकाऊंट हॅक करण्याचा सातत्याने प्रयत्न होत असल्याचा दावाही केला आहे. या अकाऊंटवर सातत्याने हल्ले होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. सीजेपीच्या फॉलोअर्समध्ये अत्यंत वेगाने वाढ होत असल्याने संपूर्ण जगभरातच त्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यातच त्यांचे एक्स अकाऊंट बंद झाल्याने आणि इन्स्टाग्राम खाते हॅक करण्याचा प्रयत्न होत असल्याने फॉलोअर्सकडून संतापही व्यक्त केला जात आहे.

# 'होय, आम्ही झुरळ!' म्हणत युवा महासंघाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रमक मोर्चा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** देशातील कोट्यवधी युवक-युवती आज शिक्षण, रोजगार, महागाई, कंत्राटीकरण, पेपरफुटी, खासगीकरण आणि असुरक्षित भविष्य अशा असंख्य संकटांशी झुंज देत आहेत. अशा परिस्थितीत देशाच्या न्यायव्यवस्थेतील सर्वोच्च पदावर असलेल्या व्यक्तीकडून युवकांची तुलना 'झुरळांशी' करण्यात येणे ही अत्यंत संतापजनक, अपमानास्पद आणि असंवेदनशील बाब असल्याची तीव्र प्रतिक्रिया भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघाने व्यक्त केली आहे.

'हा केवळ शब्दांचा प्रश्न नाही; हा देशातील तरुण पिढीच्या स्वाभिमानावर केलेला घाव आहे,' असे युवा महासंघाचे केंद्रीय समिती सदस्य ॲड. अनिल वासम यांनी सांगितले. युवक म्हणजे देशाची ऊर्जा, श्रम, बुद्धिमत्ता आणि भविष्य असून, कारखान्यात राबणारा कामगार युवक, शेतात घाम गाळणारा शेतकरी युवक, स्पर्धा परीक्षांसाठी आयुष्य झिजवणारा विद्यार्थी आणि बेरोजगारीशी झुंज देणारा पदवीधर हे 'झुरळ' नसून भारताच्या प्रगतीचे खरे शिल्पकार आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

आज देशातील लाखो युवक रोजगारासाठी रस्त्यावर उतरले आहेत. अनेकांनी नैराश्यातून आत्महत्या केल्या आहेत, तर दुसरीकडे सत्ताधारी व्यवस्था युवकांच्या मूलभूत प्रश्नांवर मौन बाळगून आहे. अशा वेळी न्यायासनावरून येणारे अपमानकारक वक्तव्य युवकांच्या जखमेवर मीठ चोळणारे असल्याची टीका करण्यात आली. संविधानिक पदांवरील व्यक्तींनी संयम, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारी जपली पाहिजे; अन्यथा जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होईल, असा इशाराही युवा महासंघाने दिला.

युवा महासंघाचे राज्य सचिव दत्ता चव्हाण म्हणाले की, 'देशातील युवक भीक मागत नाहीत, ते त्यांच्या हक्काची मागणी करत आहेत. आम्हाला 'झुरळ' समजणाऱ्यांनी लक्षात ठेवावे — याच युवकांच्या श्रमावर देश उभा आहे आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची ताकदही याच युवकांमध्ये आहे.'

भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघ जिल्हा समितीच्या वतीने भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी युवकांविषयी केलेल्या कथित विधानाच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन करण्यात आले. आंदोलनात सहभागी तरुणांनी 'होय, आम्ही झुरळ!' असे उपरोधिक विधान असलेली जॅकेट परिधान करून जोरदार घोषणाबाजी केली. आंदोलकांचा आक्रमक पवित्रा पाहून पोलिसांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला; मात्र आंदोलक थेट जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाले.



त्यानंतर निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी आंदोलनकर्त्यांना चर्चेसाठी पाचारण केले. युवा महासंघाचे जिल्हाध्यक्ष विक्रम कलबुर्गी यांच्या नेतृत्वाखाली निवेदन सादर करण्यात आले. निवेदनासोबत प्रतीकात्मक झुरळाची प्रतिमाही देण्यात आली.

सदर निवेदन मा. जिल्हाधिकारी यांच्या मार्फत महामहीम राष्ट्रपती, मा. पंतप्रधान आणि भारताचे सरन्यायाधीश यांना पाठविण्यात आले.

यावेळी युवा महासंघाचे राज्य सचिव दत्ता चव्हाण, केंद्रीय समिती सदस्य ॲड. अनिल वासम, जिल्हा कोषाध्यक्ष बाळकृष्ण मल्याळ, राज्य समिती सदस्य विजय हरसुरे, अश्विनी मामाड्याल, तसेच नरेश गुल्लापल्ली, अभिजित निकंबे, दिनेश बडगु, चंटी बिटला, राधागोपाल बंडी आदी उपस्थित होते.

# ज्या लाभार्थ्यांचे कर्ज नाकारले जाते, त्यांना बँकेने लेखी स्वरूपात नेमके कारण कळविले पाहिजे - जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हास्तरीय बँक सल्लागार समितीची बैठक जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीस जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक तसेच सर्व बँकांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत कर्जवितरणाची प्रगती, खातेउघडणीचे कामकाज आणि समितीने बँकांसमोर ठेवलेल्या उद्दिष्टांची अंमलबजावणी यांचा सखोल आढावा घेण्यात आला. तसेच ज्या लाभार्थ्यांचे कर्ज नाकारले जाते, त्यांना बँकेने लेखी स्वरूपात नेमके कारण कळविण्याचे निर्देशही त्यांनी दिले.



यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सर्व बँकांनी नेमून दिलेले टारगेट शंभर टक्के पूर्ण करणे बंधनकारक असल्याचे निर्देश देण्यात आले. उद्दिष्टपूर्ती वेळेत साध्य करण्यासाठी प्रभावी नियोजन करण्यावर भर देण्यात आला. तसेच प्रत्येक बँकेने 75 टक्के खाते उघडणीचे उद्दिष्ट पूर्ण करावे, अशी सूचना करण्यात आली.

काही बँकांच्या कामकाजाबाबत असमाधान व्यक्त करून ठरवून दिलेले पीक कर्ज पूर्ण न करणे किंवा शासकीय योजना राबविण्यात झालेल्या दिरंगाईबाबत ॲक्सिस बँक, इंडियन ओव्हरसीज बँक, बंधन बँक आणि करूर वैश्य बँक यांना जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यांनी नोटीस काढण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले.

बैठकीत नाबार्ड, ओबीसी महामंडळ, कृषी विभाग आणि जिल्हा उद्योग केंद्र (DIC) यांचा आढावा घेण्यात आला. योजनांची प्रगती, निधी उपलब्धतेची स्थिती तसेच अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणींवर चर्चा झाली. कर्ज मंजुरी किंवा नकार प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यावर भर देण्यात आला. ज्या लाभार्थ्यांचे कर्ज नाकारले जाते, त्यांना बँकेने लेखी स्वरूपात नेमके कारण कळविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले. तसेच सर्व बँकांनी जबाबदारीने कामकाज करून उद्दिष्टपूर्ती साध्य करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. प्रगतीचा पुढील आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना करण्याचे संकेतही देण्यात आले.

यावेळी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राम वाखार्डे, बँक अधिकारी कदम , जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र उमेशचंद्र दंडगव्हाळ, ओबीसी वित्त-विकास महामंडळ च्या जिल्हा व्यवस्थापक वृषाली लहारे यांच्या सह सर्व राष्ट्रीयकृत खाजगी व सहकारी बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



## संपादकीय

# महागाईचे सावट

जागतिक पातळीवरील तेलाच्या संकटाला सामोरे जाण्यासाठी देशातील जनतेने खर्चात काटकसर करावी, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केले. पंतप्रधानांनी देशातील 140 कोटी जनतेला सावध केले आणि इंधन वाचवा, खाद्यतेलाचा वापर कमी करा, विनाकारण परदेश प्रवास करू नका, वर्षभर सोने खरेदी टाळा, विजेच्या वापरात बचत करा, सार्वजनिक वाहनांतून प्रवास करा, असे आवाहन केले. पंतप्रधानांनी केलेले आवाहन म्हणजे जागतिक संकटाची चाहूल आहे. देशातील जनतेचे पालक या नात्याने पंतप्रधानांनी जनतेला सावध केले. देशात पेट्रोल-डिझेल, घरगुती व व्यावसायिक गॅस सिलिंडर, सीएनजीच्या किमतीत पाठोपाठ वाढ झाली.

अमेरिका-इस्रायल-इराण यांच्यात चालू असलेल्या युद्धाच्या झळा महागाईच्या रूपाने भारतात सामान्य लोकांच्या घरापर्यंत पोहोचल्या आहेत. युद्ध 28 फेब्रुवारीला सुरू झाले. कच्च्या तेलाचे भाव भरमसाट वाढल्याने जगातील बहुतेक देशांच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला आहे. जगात बहुसंख्य देशांमध्ये इंधनाच्या किमतीत यापूर्वीच 35 ते 55 टक्के वाढ झाली आहे. पण भारतात तुलनेने कमी व बरीच उशिरा वाढ झाली. पाच राज्यांत विधानसभा निवडणुकांचा प्रचार चालू असताना केंद्र सरकारला युद्धाच्या झळा देशात सामान्यांच्या स्वयंपाकघरात पोचतील याची आठवणही नव्हती, अशी टीका विरोधी पक्षाने केली आहे. युद्धामुळे सारे देश होरपळून निघत आहेत. अनेक देशांची अर्थव्यवस्था रुळावरून घसरली आहे. इंधनाचे दर वाढले म्हणून मोदी सरकारवर राजकीय चिखलफेक करण्याची ही वेळ नव्हे, हे विरोधी पक्षाला समजत नसेल तर हे दुर्दैव म्हणावे लागेल. जनतेला काटकसर करण्याचे आवाहन करणे, पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनाला साथ देणे, महागाई नियंत्रणाखाली कशी राहील यावर उपाय सुचवणे, जनता व सरकार यांच्यात समन्वय साधणे ही भूमिका विरोधी पक्षांकडून अपेक्षित आहे. महागाईच्या जागतिक संकटाला तोंड देण्यासाठी जनतेला दिलासा देणे हेही महत्त्वाचे आहे. महागाईच्या झळा हा काही राजकारणाचा विषय नाही.

देशातील लहान-मोठ्या शहरांमध्ये मोटारींची संख्या कित्येक लाखांमध्ये आहे. नवी दिल्ली, मुंबईसारख्या महानगरात तर मोटारींच्या झालेल्या गर्दीने अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. बस किंवा मेट्रोमधून प्रवास करण्याची हीच वेळ आहे. इलेक्ट्रिक वाहनांचा वापर केला तर इंधनाची मोठी बचत होऊ शकते. स्वतः पंतप्रधानांनी दिल्लीत दोनच मोटारी ताफ्यात बरोबर घेतल्या आहेत. इतरवेळी पंतप्रधानांच्या ताफ्यात पन्नास-साठ मोटारी असतात. या परंपरेला त्यांनी स्वतःच छेद दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दोन दिवसांपूर्वी मुंबईत चक्क मोटार बाईकवरून विधान भवनात आले. पिंपरी-चिंचवडच्या महापौर व आयुक्त हे तर सायकलवरून कार्यालयात आले. मुख्यमंत्री पुण्याहून बंगळूरला जाताना प्रवासी विमानाने गेले. खासगी व चार्टर्ड विमानांचा वापर आता मुक्तपणे करता येणार नाही, असा आदेशच मुख्यमंत्र्यांनी काढला आहे, हे स्वागतार्ह आहे. तसेच एकाच कार्यक्रमाला एकाचवेळी अनेक मंत्र्यांनी जाणेही टाळले पाहिजे. सत्तेच्या परिघातील उच्चपदस्थांनी मोटारीचे ताफे बरोबर घेऊन फिरणे लोकांना आजघडीला आवडणार नाही. भाजपची सत्ता असलेल्या अनेक राज्यांत मंत्र्यांनी व राज्यपालांनीसुद्धा त्यांच्या ताफ्यातील सरकारी वाहनांची संख्या निम्मी केली आहे. जर स्वतः पंतप्रधान एस्कॉर्ट म्हणून त्यांच्याबरोबर एकच मोटार घेतात, मग अन्य राज्यांत मंत्र्यांना जास्त मोटारींची गरजच काय? महागाईचे मोठे संकट येऊ घातले असताना राज्यकर्ते व नोकरशहा यांनीही इंधन वापराबाबत काटकसर केली पाहिजे व जनतेला तसा आदर्श घालून दिला पाहिजे.

देशातील जनतेला काटकसरीचे आवाहन करून पंतप्रधान चार दिवसांच्या विदेश दौऱ्यावर रवाना झाले म्हणून विरोधी पक्षांनी लगेचच टीका केली. पण पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्रपती अल नाहयान यांच्यात द्विपक्षीय झालेल्या बैठकीत भारत व संयुक्त अरब अमिराती (यूएई) यांच्यात एलपीजी पुरवठ्यासह पाच करार केले. सध्याच्या परिस्थितीत एलपीजी पुरवठ्याविषयी झालेला करार भारतासाठी मौल्यवान आहे. पंतप्रधान किंवा उच्चपदस्थांचे विदेश दौरे व कार्यक्रम अगोदर ठरलेले असतात, ते काही ऐनवेळी ठरत नाहीत, याचेही भान विरोधी पक्षाला नसावे याचे आश्चर्य वाटते. पंतप्रधान विदेश दौऱ्यावर भारताच्या भल्यासाठी गेले होते, हे त्यांनी तेथे केलेल्या करारानंतर स्पष्ट झाले आहे. युद्धाचा परिणाम म्हणून इंधनाचे दर वाढले आहेत. कदाचित नजीकच्या काळात ते आणखी वाढण्याची शक्यता आहे. अशा वेळी विरोधकांनी राजकीय चष्म्यातून या विषयाकडे पाहणे जनहिताचे नाही. सोने आणि तेल यांच्या आयातीवर देशाचे सर्वाधिक परकीय चलन खर्च होते. भारत 70 ते 75 टक्के तेल आयात करतो.

गेल्या वर्षी 11 लाख 66 हजार कोटी तेलाच्या आयातीवर खर्च झाले. तसेच सोने 90 टक्के आयात केले जाते. गेल्या वर्षी सोन्याच्या आयातीवर 6.4 लाख कोटी खर्च झाले. सोने व तेल यांच्या आयातीत कपात झाली तर भारताचे परकीय चलन वाचू शकेल. इंधन दरवाढीचा परिणाम म्हणून राज्यातील एसटी बसच्या तिकिटातही वाढ करावी लागेल, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संकेत दिले आहेत. इंधन दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढणर व भाजीपाला, अन्नधान्य, औषधे, डिलिव्हरी सेवा, खाद्यपदार्थ आदी जीवनावश्यक वस्तूंची भाववाढ होणे अटळ आहे. गेल्या तीन महिन्यांत देशातील तीन प्रमुख तेल कंपन्यांचा तोटा दरमहा एक लाख 20 कोटींवर पोहोचला आहे. सहा महिने असाच तोटा झाला तर या कंपन्या दिवाळखोरीकडे जाण्याची भीती आहे. सध्या केवळ तीन टक्के इंधनाचे दर वाढले आहेत. नजीकच्या भविष्यात पेट्रोल-डिझेल 15 ते 18 रुपये वाढण्याची शक्यता अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. काटकसर, स्वदेशी पर्यायांचा वापर आणि ऊर्जा बचतीची सवय यामुळेच देशावर येणारा आर्थिक ताण काही प्रमाणात कमी होऊ शकतो. संकटाच्या काळात संयम, जबाबदारी आणि राष्ट्रीय हिताची जाणीव ठेवून प्रत्येक नागरिकाने आपली भूमिका पार पाडणे हीच काळाची गरज आहे.

# बौद्धिक आळस झटका!

इयत्ता दहावी बारावी परीक्षेचे निकाल लागले आहेत. सर्वसाधारणपणे ज्यांनी सर्वाधिक अभ्यास केला त्याला ९० ते १००% इतके गुण मिळाले आहेत,तर मध्यम अभ्यास करणाऱ्यांना ८० ते ९० टक्के पर्यंत गुण मिळाले आहेत या निकालांची गंमत म्हणजे कमी अभ्यास करणारे देखील ६०% गुणांच्या वर आहेत आणि ज्यांनी अत्यल्प अभ्यास केला ते सुद्धा पास झाले आहेत थोडक्यात जे नापास झाले आहेत त्यांनी वर्षभरात एकूण ५० तास देखील स्वयंअध्ययन केलेले नसेल ज्यांनी एकूण वर्षभरात ५० तास पेक्षा जास्त वेळ अभ्यास केला ते ते सर्वजण पास झाले आहेत. म्हणजेच वर्षभरातील ३६५ दिवसा पैकी केवळ दोन ते तीन दिवस अभ्यास करणारे पास झाले आहेत. अभ्यास करण्यास म्हणजेच पुस्तकाचे वाचन करण्यास, लेखन करण्यास, गणिती क्रियांचा सराव करण्यास, चिंतन मनन आणि तार्किक विचार करण्यास आळस वाटत असेल तर तुम्ही बौद्धिक दृष्ट्या आळशी आहात. थोडक्यात तुम्हाला बौद्धिक कष्ट नकोसे वाटते.

आपण समाजातील विविध सेवा देणाऱ्या व्यक्तीकडे जेव्हा पाहतो तेव्हा आपल्याला खूपच विसंगत चित्र पाहायला मिळते उन्हात राबराब राबणारे बांधकाम कामगार रंगारी ड्रायव्हर सफाई कामगार विविध कंपन्यातील कामगार हमाल हे सारे अफाट कष्ट घेत असतात परंतु या सर्वांना अगदीच तुटपुंज वेतन असते याउलट डॉक्टर इंजिनिअर वकील सरकारी अधिकारी आणि कर्मचारी शिक्षक प्राध्यापक यांना मात्र सावलीत पंख्याच्या हवे खाली एसी मध्ये काम करावे लागते पण त्यांना मात्र त्यांच्याहून अधिक वेतन असते. हे असे का ? याचे उत्तर इयत्ता दहावी बारावी परीक्षा मध्ये मिळते जे लोक बौद्धिक कष्ट घेतात त्यांना सर्वाधिक लाभ मिळतो. तर जे बौद्धिक आळस माळकतात त्यांना जीवनातील पुढील काळात स्वतःच्या आणि आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी शारीरिक कष्ट घ्यावे लागते त्याचबरोबर त्यांना आर्थिक विवंचनेत आपले अवघे आयुष्य काढावे लागते.

औद्योगीकरणानंतर निर्माण झालेली ही व्यवस्था जरी अन्यायकारक असली तरी तीच आजच्या आधुनिक जगाने अवलंबली आहे हे सत्य सर्वांनी मान्य केले पाहिजे समाजवाद ही एक आदर्श कल्पना म्हणून उरली आहे. अशा काळात सर्वजण बौद्धिक कष्ट करू शकतात आणि सर्वजण स्वतःचा संभाव्य शारीरिक मानसिक आर्थिक छळ थांबू शकतात जी मुले अजून देखील आपल्या भविष्याबाबत जागरूक झाली नसतील त्यांना बौद्धिक कष्टाचे महत्त्व समजून सांगून त्यासाठी त्यांना तयार करावे लागणार आहे जन्मजात अल्पबुद्धी मतिमंद अथवा बौद्धिक दृष्ट्या दुर्बल मुलांना सोडून इतरांना बौद्धिक आळशीपणा झटकून देण्यासाठी विविध उपाय योजावे लागणार आहेत.

माझे मित्र प्रा.डॉ. बापू राऊत यांनी आपल्या फेसबुक वॉलवर आपले विचार पुढील शब्दात मांडले होते - "बुद्धिमत्ता उपजत असते, गुणवत्ता नव्हे, गुणवत्ता परिश्रमपूर्वक निर्माण करावे लागते. सोने निसर्गात सापडते.संगमरवर ही निसर्गात सापडतो; परंतु सोन्याचा अलंकार करण्यासाठी आणि संगमरवराचा ताजमहल उभारण्यासाठी कुशल आणि कल्पक कारागीर लागतो. बुद्धिमत्तेचे गुणवत्तेचे रूपांतर करण्यासाठी देखील सक्षम, कुशल, कल्पक आणि योग्य मार्गदर्शकाची आवश्यकता असते. " त्यांच्या या म्हणण्यात नक्कीच सत्य आहे.मार्गदर्शक कल्पक हुशार मिळाले तरी विद्यार्थ्यांनी स्वतः बौद्धिक आळस झटकून स्वतःची अभ्यासासाठी बसण्याची बैठक क्षमता वाढवून उपजत मिळालेल्या बुद्धिमत्तेचा पुरेपूर फायदा घेत स्वतःची गुणवत्ता वाढवली पाहिजे. अर्थातच स्वतःची गुणवत्ता वाढवण्यासाठी बुद्धिमत्तेनुसार प्रत्येक विद्यार्थ्याला कमी जास्त वेळ द्यावा लागणार आहे. उपजत कमी बुद्धिमान असणाऱ्या विद्यार्थ्याला संकल्पना समजण्यास जास्त वेळ लागेल परंतु त्याला ते आपल्या स्वतःच्या बौद्धिक कष्टाने प्राप्त करावे लागणार आहे.

अभ्यासासाठी मेहनत घेणे म्हणजेच तासन्तास वाचत लिहत बसणे यालाच बौद्धिक कष्ट म्हणायचं. विविध समस्या प्रश्न सोडवणे, प्रश्नपत्रिका परत परत सोडवणे, हे सर्व बौद्धिक कष्टाचे प्रकार आहेत.वेळच्यावेळी शंका निरसन करून घेणे, एकदा चुकलेलं परत लिहून काढणं, झालेला चुका समजून घेऊन पुन्हा आपल्या उत्तराचा मसुदा बदलून लिहिणं हा सुद्धा बौद्धिक कष्टाचाच भाग आहे. लिहिणं आणि वाचन त्यापेक्षा विविध माध्यमातून उत्तराचा पाठपुरावा सातत्याने करनं.न कंटाळता आणि अभ्यासाची बैठक न मोडता सर्व लक्ष अभ्यासावर केंद्रित करणं हा बौद्धिक कष्टाचा भाग आहे.आपण अभ्यासाकरिता जो वेळ देतो त्यापेक्षा तो जास्त देणं, त्याचा वेळ वाढवणे आणि इतर गोष्टींना स्वतःपासून काही काळ दूर ठेवणं, एकाग्रता वाढवणे यालाच बौद्धिक कष्ट असे म्हणतात. अर्थातच हे सार करण्यास जो विद्यार्थीदशेपासून सुरुवात करतो त्याला पुढील आयुष्यात बौद्धिक कष्टाचीच अर्थातच सावलीत बसून काम करण्याची नोकरी मिळते आणि जे बौद्धिक आळशी असतात त्यांना मात्र पुढील आयुष्यात शारीरिक कष्ट करण्याशिवाय पर्याय नसतो. थोडक्यात बौद्धिक आळस झटकून बौद्धिक कष्ट घेण्यास स्वतःला तयार करा हाच सदाचा जीवनात यशस्वी होण्याचा आजच्या काळातील मूलमंत्र आहे.



**- किशोर जाधव**
शिक्षक आणि लेखक, सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

# सोलापूरच्या स्मार्ट सुनबाई - 'सौ. रजनीगंधा संदीप गायकवाड'

बालविवाह प्रतिबंधक आणि अल्पवयीन माता सुरक्षिततेच्या मुद्द्यावर ' " म. फुले समाज सेवा मंडळ, करमाळा "या संस्थेच्या सातत्यपूर्ण पाठ पुराव्यामुळे प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळू लागला. समाजाची मानसिकता बदलणे गरजेचे आहे.यासाठी पथनाट्य व लोककलेच्या माध्यमातून जनजागृती करण्याची गरज असल्याची जाणीव झाली महानगरपालिका आरोग्य खात्याकडून 86 अल्पवयीन मातांची यादी मोठ्या कौशल्याने मिळून प्रशासनाच्या वेगवेगळ्या ई-मेलवर पाठवून मोठी खळबळ उडवून प्रशासनाला जाग केल .प्रशासकीय अधिकारी,पोलीस खाते, डॉक्टर,इत्यादींची धावपळ सुरू झाली.अनेकांवर गुन्हे दाखल तर अनेक जणांना चौकशीला सामोरे जावे लागले. अल्पवयीन मातेच्या मातापित्यांचा शोध सुरू झाला. अशा प्रकारे खळबळ उडून देणारी व्यक्ती म्हणजे सौ. रजनीगंधा संदीप गायकवाड



**या रजनीगंधा कोण ?**

उमरगा जिल्हा उस्मानाबाद मधील अचलेर या खेड्यातील शेतकरी कुटुंबातील दिलीप माने व सौ ज्योती माने आपले कुटुंब घेऊन नोकरीनिमित्त वेगवेगळ्या गावी गेले. दिलीप माने जल संधारण खात्यात नोकरी करू लागले. दिलीप माने व सौ ज्योती माने यांना तीन आपत्ये झाली. रजनीगंधा, सौरभ, संदेश.

28 जानेवारी 1995 रोजी रजनीगंधा हिचा जन्म झाला.मुलाचे पाय पाळण्यात दिसतात. या म्हणी प्रमाणे तिचे गुण दिसू लागले. रजनी म्हणजे रात्र, गंध म्हणजे सुगंध.याप्रमाणे रात्रंदिवस सुगंध पसरेल असे कार्य तिच्या हातून होईल म्हणून तिचे नाव रजनीगंधा ठेवले. नावाप्रमाणे तिने तसे कार्यही करून दाखवले.

रजनीगंधा चे बालपण व शिक्षण वडिलांची सरकारी नोकरी असल्याने सततच्या बदल्या मुळे वेगवेगळ्या तालुक्यात-जिल्ह्यात झाले. बीए शिक्षणानंतर सामाजिक कामाची आवड म्हणून मानवलोक समाजकार्य महाविद्यालय अंबाजोगाई येथून एम. एस.डब्ल्यू चे शिक्षण घेतले. माहेरी - सासरी श्रीमंती अशी की वडील आणि पती दोघेही प्रत्येक सुख देऊन देखील त्यांना शांत बसवेना या साठी त्यांनी सामाजिक कामासाठी वेळ देण्याचे ठरवले.त्यावेळी एच आय व्ही रोगाची साथ सुरू झाली होती. रजनीगंधाने एच आय व्ही बाधित महिला व बालकांसाठी तीन वर्ष काम केले.अनेकांना एच आय व्ही मधून वाचवले. समाजाचे आपण काही देणे लागतो या भूमिकेतून रजनीगंधा यांनी अनेकांना आर्थिक मदतही केली.

28 जानेवारी 2020 रोजी संदीप गायकवाड यांच्याशी त्यांचा विवाह झाला. आणि त्या सोलापूरच्या सुनबाई झाल्या. साध्या सुनबाई नसून त्या स्मार्ट सुनबाई झाल्या त्यांचे काम वाखण्याजोगे आहे. पती संदीप यांनाही समाजसेवेची आवड असली तरी उद्योगातून त्यांना वेळ मिळत नव्हता. स्वतःला वेळ मिळत नाही म्हणून त्यांनी पत्नी रजनीगंधाला समाज सेवेपासून कधीही वंचित ठेवले नाही.उलट त्यांच्या कामात मदत केली.प्रोत्साहन ही देत गेले.

सोलापूर मध्ये आल्यानंतर त्यांनी युवा ग्राम विकास मंडळाकडे सामाजिक कायार्ला सुरुवात केली. एक वषार्नतर युवा ग्राम विकास मंडळाचे काम थांबले. आणि करमाळ्याचे सामाजिक कार्याला वाहून घेतलेले प्रमोद झिंजाडे यांच्या म.फुले समाज सेवा मंडळात जिल्हा समन्वयक पदावर कायार्ला सुरुवात केली.अल्पवयीन माता, बालविवाह,बालकामगार या क्षेत्रात रजनीगंधांचे कार्य पुनश्च सुरू झाले.

स्वच्छता अभियान राबवायचे असेल तर स्वतःची घरे अगोदर स्वच्छ करावीत. मगच गावे स्वच्छ करावी. याप्रमाणे पती व्यसन करतात हे समजताच त्यांना समुपदेशन करून गोडी गुलाबीने बाहेर काढले हा त्यांच्या आयुष्यातील सर्वात आनंदाचा क्षण ठरला त्याच बरोबर त्यांनी स्वतःच्या घरातील स्त्री म्हणजे नात्यातील व्यक्ती कामा करिता म्हणजे स्वतःच अस्तित्व निर्माण करण्याकरिता बाहेर काढली जी कधीच घराबाहेर पडली नव्हती.घरात स्वस्थ न बसता विविध महिला मंडळ, बचत गट, पती-पत्नी मधील वाद संपुष्टात आणून परत पती पत्नीचा संसार सुखी सुखाचा करण्यासाठी समुपदेशन करीत.अनेक प्राथमिक शाळेमध्ये जाऊन मुलांची उपस्थिती बघत. उपस्थिती कमी दिसली तर त्या गॅरेज, हॉटेल, सायकल दुकाने,गवंडी कामात बिगारी इत्यादीं पाहणी करीत. कधी दुकानासमोर जात. त्या ठिकाणी लहान मुले शाळेत गैरहजर राहून काम करताना दिसली तर मुलांना दुकानातून हकलून देत व शाळेत पाठवत दुकानाच्या मालकांना मुलाकडून अवजड काम करून घेऊ नका म्हणून समज देत.यातूनच त्यांच्या मनात बाल कामगार संकल्पना येऊ लागली.

म. फुले समाजसेवा मंडळाच्या माध्यमातून वीट भट्टी, ऊसतोड कामगार, गॅरेज, हॉटेल, लॉज, चायनीज गाडे, वडापाव सेंटर,भाजी मार्केट येथे जाऊन बालकामगार विषयक धडक मोहीम सुरू केली. बालकामगार आढळल्यास मालक लोकांवर गुन्हे दाखल होऊ लागले. तर झोपडपट्टी, गावाच्या बाहेर वाड्या, वस्त्या,कापडी पाल बांधून राहणाऱ्या लोकांमध्ये जाऊन मुलांना प्रसंगी खाऊ देऊन महिलांची विचारपूस करीत.त्यांना कुटुंबनियोजन,शिक्षण,स्वच्छता इत्यादी विषयी समुपदेशन करीत. त्या अडचणीच्या वेळी सौ. सुजाता कांबळे,वामन बावळे यांना सोबत घेऊन जात हे दोघेही सहकार्याच्या भावनेतून तिला मदत करीत असत.त्यांच्या मदतीने अनेक सामाजिक उपक्रम राबवत. सद:स्थितीमध्ये महानगरपालिका सोलापुर येथील 86 बालमाता नोंदी शोधून काढल्या व संबंधित अधिकाऱ्यांना ई-मेल द्वारे कळवून संबंधित वैद्यकीय अधिकारी, प्रशासन यांची चौकशी लावली. या प्रकरणाची सखोल चौकशी झाल्यास अनेक बडे मासे गळाला लागतील.सध्या सोलापूर "अल्पवयीन बालमाता "प्रकरण महाराष्ट्रभर गाजत आहे. अशा धडाडीच्या उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सोलापूरच्या साध्या सुनबाई नसून त्या स्मार्ट सुनबाई बनल्या असेच म्हणावे लागेल. अशा स्मार्ट सुनबाईच्या कार्याला आमच्या सोलापूरकरांच्या लाख लाख शुभेच्छा !

# 'उजनी' ची पाणी पातळी मायनस 16 टक्के

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गेल्या वर्षी मुसळधार पाऊस पडला असताना आणि उद्भवलेल्या पूर परिस्थितीमुळे जवळपास अडीशे टीएमसी पाणी हे भीमा नदीतून वाहून गेले असताना यंदाच्या वर्षी पुन्हा टंचाईच्या झळा जिल्ह्याला निर्माण होऊ लागली आहेत.

जानेवारी अखेरपर्यंत उजनी धरण हे शंभर टक्के भरले होते. अवघ्या चारच महिन्यात 121 टीएमसी एवढी पाणी साठवणूक क्षमता असलेल्या या धरणातील पाणीसाठा निम्मा कमी होऊन तो आज सकाळी सहाच्या आकडेवारीनुसार 55 टीएमसी एवढा शिल्लक राहिला आहे.

गेल्या वर्षी आजच्या तारखेला उजनी धरणाची पाणी पातळी मायनस 23 टक्के होती. यंदाच्या वर्षी देखील ही पाणी पातळी आता त्या दिशेने वाटचाल करत असून आजच्या आकडेवारीनुसार मायनस पातळी साडे पंधरा टक्के इतक्या खाली पोहोचली आहे.



सध्या 2100 क्युसेक ने धरणातून कॅनल द्वारे शेतीसाठी पाणी पाणी सोडले जात असून होणारी बाष्पीभवन यामुळे दररोज दोन टक्के एवढा पाणीसाठा कमी होत आहे. मान्सून वेळेवर दाखल झाला तर सोलापूर जिल्ह्यातील सर्व काही ठीक होईल मात्र अल निनो चा अडथळा निर्माण झाल्यास मात्र पाणी टंचाई निर्माण होणार आहे. त्यामुळे पाण्याचे काटेकोर नियोजन करणे गरजेचे आहे.

# यंत्रणांनी सतर्क राहून आपत्ती व्यवस्थापन करावे : पालकमंत्री चंद्रकांत पाटील

**सांगली (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात मान्सून कालावधीत उद्भवू शकणाऱ्या संभाव्य पूरस्थितीत तसेच, एल निनोच्या संभाव्य परिणामाच्या अनुषंगाने टंचाईस्थितीच्या पार्श्वभूमिवर संबंधित सर्व यंत्रणांनी सतर्क राहून आपत्ती व्यवस्थापन करावे. सर्व विभागांनी परस्पर समन्वय ठेवून कोणत्याही परिस्थितीत मदत व बचावासाठी तातडीने प्रतिसाद देण्याची तयारी ठेवावी. जीवित व वित्तहानी टाळून, नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देऊन उपाययोजना आखाव्यात, असे निर्देश राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज येथे दिले.

आपत्ती व्यवस्थापनअंतर्गत मान्सूनपूर्व तयारी आणि एल निनोच्या संभाव्य परिणामाच्या अनुषंगाने टंचाईस्थिती अशा दोन्ही परिस्थितीत यंत्रणांच्या पूर्वतयारी बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी संभाव्य पूरस्थिती आणि एल निनोच्या अनुषंगाने टंचाईस्थिती अशा दोन्ही बाबींचा आढावा घेण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक कक्षात आयोजित या बैठकीस आमदार इद्रिस नायकवडी, जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष, महापालिका आयुक्त संजिता महापात्र, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल



नरवाडे, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. स्नेहल कनिचे, पालकमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी बाळासाहेब यादव, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी रफिक नदाफ यांच्यासह विविध यंत्रणाचे प्रमुख अधिकारी प्रत्यक्ष तर सांगली पाटबंधारे मंडळाचे अधीक्षक अभियंता चंद्रशेखर पाटोळे, महसूल उपविभागीय अधिकारी व अन्य संबंधित यंत्रणांचे क्षेत्रीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, 2019 व 2021 चा पूवार्नुभव लक्षात घेऊन संभाव्य पूरपरिस्थितीत नदीकाठच्या गावांमध्ये सतर्कता वाढवावी. धोकादायक ठिकाणांची पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना तातडीने पूर्ण कराव्यात. दरडग्रस्त गावांचे सर्वेक्षण करावे. जास्त पर्जन्यमान असणाऱ्या कालावधीत दैनंदिन मॉनिटरिंग करावे. आलमट्टी धरण प्रशासनाशी नियमित समन्वय ठेवावा. संभाव्य पूरबाधित गावांचे रेकॉर्ड जतन करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. पाणी योजना वीजदेयक भरण्याअभावी खंडित होतात, या पार्श्वभूमिवर मोठ्या गावांच्या पाणी योजना सौरउर्जेवर करण्यासाठी प्रयत्न करावेत. धोकादायक शाळा, इमारतींचे ऑडिट करावे. अतिधोकादायक इमारती निर्लेखित कराव्यात. नागरिकांना वेळोवेळी सूचना देण्यासाठी ग्रामस्तरावर नियंत्रण यंत्रणा कार्यरत ठेवावी. महापालिका क्षेत्रात पुरामुळे नियमित बाधित होणाऱ्या क्षेत्रात संरक्षक भिंत बांधावी, असे त्यांनी यावेळी सूचित केले.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, पूरप्रवण गावांची अद्ययावत यादी, नदी पातळीतील बदलाबाबत नागरिकांना तात्काळ माहिती देण्यासाठी अलर्ट प्रणाली, तसेच आपत्कालिन परिस्थितीसाठी बचाव साहित्य सज्ज ठेवावे. निवारा केंद्रांमध्ये पिण्याचे पाणी, वीज, स्वच्छता व आरोग्य सुविधा उपलब्ध ठेवाव्यात. जलसंपदा, आरोग्य, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभागांनी त्यांची जबाबदारी चोख पार पाडावी. आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवावा. अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीलाच प्राधान्य द्यावे, यासाठी जनजागृती करावी, असे त्यांनी यावेळी सूचित केले.

# राज्यातील रस्ता अपघात मृत्युदरात लक्षणीय घट
## परिवहन विभागाच्या उपाययोजनांचे यश

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रात रस्ता सुरक्षेसाठी परिवहन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या कठोर आणि तंत्रज्ञानाधारित उपाययोजनांचा सकारात्मक परिणाम दिसून येत असून, राज्यातील प्राणघातक अपघात आणि अपघाती मृत्यूंच्या संख्येत लक्षणीय घट नोंदविण्यात आली आहे. जानेवारी ते एप्रिल २०२६ या कालावधीत राज्यातील प्राणघातक अपघात आणि मृत्यूंची संख्या मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल ८ टक्क्यांनी कमी झाली आहे.

परिवहन विभागाच्या आकडेवारीनुसार, जानेवारी ते एप्रिल २०२५ या कालावधीत राज्यात १२ हजार ६१० अपघात, ५ हजार २७५ प्राणघातक अपघात आणि ५ हजार ६८१ अपघाती मृत्यू झाले होते. याच कालावधीत २०२६ मध्ये अपघातांची संख्या १२ हजार ३८९ इतकी राहिली असून, प्राणघातक अपघातांची संख्या ४ हजार ८२७ आणि मृत्यूंची संख्या ५ हजार २३३ इतकी नोंदविण्यात आली. परिणामी एकूण अपघातांमध्ये २ टक्के, तर प्राणघातक अपघात आणि मृत्यूंमध्ये प्रत्येकी ४४८ ने घट झाली आहे.

राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये रस्ता सुरक्षा उपाययोजनांमुळे मृत्यूंच्या संख्येत मोठी घट दिसून आली आहे. वाशिम जिल्ह्यात मृत्यूंची संख्या ३७ टक्क्यांनी घटली असून, बीड आणि नागपूर शहरात प्रत्येकी २९ टक्के घट नोंदविण्यात आली आहे. नाशिक शहरात २८ टक्के, नवी मुंबईत १९ टक्के, तर भंडारा, सांगली आणि सातारा येथे प्रत्येकी १७ टक्के घट झाली आहे. बुलढाणा आणि सिंधुदुर्गमध्ये १५ टक्के, तर धाराशिव, नांदेड आणि नंदुरबार येथे १३ टक्क्यांनी मृत्यूदर कमी झाल्याचे आकडेवारीतून दिसून येते.

२०३० पर्यंत राज्यातील रस्ता अपघातांची संख्या ५० टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दिष्ट परिवहन विभागाने निश्चित केले असून, त्यासाठी व्यापक स्वरूपातील उपाययोजना राबविण्यात येत आहेत. राज्यस्तरासह प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र रस्ता सुरक्षा कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. प्रत्येक जिल्ह्याच्या अपघातांची कारणे आणि स्थानिक गरजा लक्षात घेऊन स्वतंत्र रस्ता सुरक्षा आराखडे तयार करण्यात आले असून त्यांची अंमलबजावणी सुरू आहे.

# वाहनांना एचएसआरपी बसविण्यासाठी ३० जून २०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील दिनांक १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (एचएसआरपी) पाटी बसविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ३० जून २०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ दिली आहे. यापूर्वी ही मुदत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत होती. मात्र, राज्यातील केवळ ५० टक्के जुन्या वाहनांवरच एचएसआरपी बसविण्यात आल्याचे आढळून आल्याने शासनाने ही मुदत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.

परिवहन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ज्या वाहन मालकांनी निर्धारित मुदतीत एचएसआरपी बसविणार नाही किंवा त्यासाठी आगाऊ वेळ (अपॉईंटमेंट) घेणार नाहीत, अशा वाहनांची १ जुलै २०२६ पासून रस्त्यावर तपासणी करण्यात येणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांकडून मोटार वाहन कायदा व नियमांनुसार एक हजार रुपये तडजोड शुल्क आकारण्यात येणार आहे.

वाहन मालकांनी एचएसआरपी बसविण्यासाठी परिवहन विभागाच्या http://transport.maharashtra.gov.in?utm_source=chatgpt.com या संकेतस्थळावर जाऊन ३० जून २०२६ पर्यंत ऑनलाईन अपॉईंटमेंट घ्यावी, असे आवाहन सह परिवहन आयुक्त (संगणक) शैलेश कामत यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

## वात्रटिका

### आम्हाला वाटते

भारत माझा महान
मला अभिमान वाटतो...
आमदार,खासदार,मंत्री
तर कधी पेपर फुटतो...
तपास दणक्यात सुरु आहे
पण कोणाला काहीच होत नाही...
कोणाला तरी काही व्हावे ही
भाबडी इच्छा आणि उगाच घाई...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# छत्रपती प्रतिष्ठानच्या वतीने सामाजिक उपक्रमाद्वारे अभिवादन



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या 369 व्या जयंतीनिमित्त, अकलूज येथील सदभाऊ चौकामध्ये, छत्रपती प्रतिष्ठान माळशिरस तालुका यांच्यावतीने, विविध सामाजिक उपक्रम राबवून अभिवादन करण्यात आले.

छत्रपती प्रतिष्ठान माळशिरस तालुका यांच्यावतीने, गेली दहा वर्षे झाले, शिवजयंती व संभाजी महाराज जयंती निमित्त वायफळ खर्च टाळून, विविध सामाजिक उपक्रम आयोजित करुन जयंती साजरी केली जाते.

ज्या मराठा सेवकाने सलग 3 दिवस मराठा समाजाच्या मागण्यांसाठी अन्नत्याग करत आमरण उपोषण अकलूज येथे केले होते. त्याच मराठा सेवकाने यावर्षी, छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त, मनोज जरांगे पाटील यांचा माळशिरस तालुक्यातील मराठा सेवक, आशुभाऊ ढवळे यांच्या आयोजनातुन व जनतेच्या सहकार्यातून हे उपक्रम पार पडले. छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त समाजिक उपक्रम राबवण्याचे छत्रपती प्रतिष्ठानचे हे 11 वर्षे आहे. यावर्षी 369 व्या जयंतीनिमित्त सदभाऊ चौक येथे संभाजी महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.सदर कार्यक्रमास माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, नगरसेवक सयाजीराजे मोहिते-पाटील, अनंत चव्हाण-पाटील, सचिन शिंदे आदीनी भेट देवुन स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले.यावेळी सदाशिवराव माने विद्यालयातील विद्यार्थ्यांना छत्रपती संभाजी महाराजाच्या जिवनपटाची माहीती दर्शविणाऱ्या 369 पुस्तकांचे वाटप करण्यात आले.तसेच मिष्टान्न भोजन व 1000 भगव्या गमजाचे वाटप करण्यात आले.

महापुरुषांच्या जयंतीला वायफट खर्च टाळून सामाजिक उपक्रम राबवल्याची दखल घेवुन विविध संस्थानी आशुभाऊ ढवळे यांना तीन पुरस्कार दिलेले आहेत.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आशुभाऊ ढवळे (छत्रपती प्रतिष्ठान) रविंद्र माने, शारदाताई चव्हाण, अरुधती हजारें, अमित सावंत, सचिन चव्हाण, सुशांत माने, रमजान तांबोळी, रेखा महेश माने, दिनेश पाटील, नाजीर बागवान, ओंकार कांबळे, गणेश कदम, दिगंबर वाघोले, आनंद लोंढे पाटील, निलेश चव्हाण यांनी परीश्रम घेऊन उपक्रम पार पडला.

# कोंडी गावात जनगणना सहसंचालक रमेश भोसले यांची अचानक पाहणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** देशभरात १६ मे ते १५ जून दरम्यान सुरू असलेल्या जनगणनेच्या पहिल्या टप्प्यातील घरयादी गणनेच्या कामाची पाहणी करण्यासाठी जनगणना कार्यालय मुंबईचे सहसंचालक रमेश भोसले यांनी रविवारी दुपारी कोंडी गावाला अचानक भेट दिली. यावेळी सांख्यिकी अधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी अजित भांड हेही उपस्थित होते.

अधिकाऱ्यांनी प्रगणकांना वाटप करण्यात आलेल्या भागांची पाहणी केली तसेच घरांवर क्रमांक टाकण्याची प्रक्रिया आणि जनगणना मोबाईल ॲपची माहिती प्रत्यक्ष तपासली. त्यांनी काही घरांना भेट देत प्रगणकांना आवश्यक मार्गदर्शनही केले.

यावेळी सहसंचालक रमेश भोसले यांनी जनगणनेसाठी वापरण्यात येणारे 'एचएलओ' मोबाईल ॲप पुढील दोन दिवसांत अपडेट होणार असून, त्यामध्ये स्वगणना केलेल्या नागरिकांची माहितीही उपलब्ध होईल, अशी माहिती दिली. भर उन्हात राष्ट्रीय कर्तव्य म्हणून जनगणनेचे काम जबाबदारीने पार पाडणाऱ्या कर्मचाऱ्यांचे त्यांनी कौतुक करत समाधान व्यक्त केले.

उत्तर सोलापूर तालुक्याचे तहसीलदार तथा जनगणना चार्ज अधिकारी निलेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात १४५ प्रगणक आणि २४ पर्यवेक्षक जनगणनेचे काम करत आहेत.

यावेळी तज्ज्ञ मार्गदर्शक लतिफ तांबोळी, शिवाजी भोसले, कोंडी गावचे प्रगणक ज्ञानेश्वर लांबतुरे, दीपक मोरे, अळगी, पुष्पा कांबळे मॅडम आणि शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उदय कोढांरे यांनी सर्वांचे आभार मानले.

# शेतकरी हितासाठी सकारात्मक निर्णयाची अपेक्षा - आ. रणजितसिंह मोहिते-पाटील



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** मुंबई येथे झालेल्या इथेनॉल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ इंडियाच्या कार्यकारी मंडळाच्या महत्त्वपूर्ण बैठकीत उद्योगाशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आल्याची माहिती आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी दिली.

यावेळी निती आयोग, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येणाऱ्या पत्राच्या मसुद्यासह उद्योगाच्या विविध मागण्यांवर संचालक मंडळ व संबंधित अधिकाऱ्यांसमवेत चर्चा झाली. साखर उद्योग हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून लाखो ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे जीवन या उद्योगाशी जोडलेले असल्याचे त्यांनी सांगितले. देशाच्या ऊर्जा स्वावलंबनासाठी साखर उद्योगाने इथेनॉल निर्मितीत मोठी गुंतवणूक केली असली तरी अलीकडे धान्यावर आधारित इथेनॉल निर्मितीकडे वाढलेल्या कलामुळे साखर आधारित इथेनॉल क्षमतेचा अपेक्षित वापर होत नसल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली.

ऊर्जा सुरक्षा, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन केंद्र सरकारने सकारात्मक व दूरदृष्टीपूर्ण निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा आ. मोहिते-पाटील यांनी व्यक्त केली.

# युवकांनी नोकरी न लागल्यास निराश न होता स्वयंरोजगारावर भर द्यावा - प्रदिप चौगुले



**माढा (कटूसत्य वृत्त):-** आज प्रत्येक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढत आहे त्यामुळे अनेक तरुण नैराश्याच्या गर्तेत जातात.काही जण जगण्यासाठी शासकीय नोकरी नाही म्हणून टोकाची भूमिका घेतात तेंव्हा यावर उपाय म्हणून युवकांनी नोकरी न लागल्यास निराश न होता लहान-मोठ्या व्यवसायातून स्वयंरोजगार निर्मिती करावी असे आवाहन सरपंच प्रतिनिधी प्रदिप चौगुले यांनी केले आहे.

ते अंजनगाव खेलोबा ता.माढा येथे श्री जाधव परिवाराच्या मातोश्री डिजिटल सोल्यूशन्सच्या उद्घाटनाच्या वेळी बोलत होते.

यावेळी सेवानिवृत्त कृषी विस्ताराधिकारी सज्जनराव जाधव यांनी सांगितले की, आजच्या स्पर्धेच्या युगात उच्च दर्जाच्या गुणवत्तेशिवाय शासकीय नोकरीची संधी मिळत नाही त्यामुळे युवकांनी निराश न होता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कृषी व कृषीपूरक व्यवसाय व उद्योग उभारले पाहिजेत.नोकर होण्यापेक्षा मालक होणे अधिक चांगले आहे.कोणत्याही क्षेत्रात प्रामाणिकपणे काम केले की,अपेक्षित अर्थार्जन होऊन जीवन नक्कीच यशस्वी होते असे त्यांनी सांगितले.

यावेळी हभप शिवाजी जाधव, सेवानिवृत्त बँक इन्स्पेक्टर व्यंकटराव पाटील, सेवानिवृत्त विस्तार अधिकारी सज्जनराव जाधव, अर्जून जाधव, समाधान इंगळे, विनायक चौगुले, किसन क्षीरसागर, आनंद पाटेकर, तात्या लटके, दिलीप चौगुले, गहिनीनाथ गडेकर, रोहित लटके, शुक्राचार्य लटके, महादेव गडेकर, अजिंक्य पाटील, सचिन चौगुले, मनोज चव्हाण, अतुल सुरवसे, दिगंबर जाधव, सिद्धेश्वर जाधव, रोहित इंगळे, अंगद लटके, दत्तोपंत लटके, दगडू इंगळे, संग्राम इंगळे, सुरेश जाधव, लखन डोके यांच्यासह ग्रामस्थ व युवक उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली अक्कलकोट व चिंचोली MIDC मधील प्रश्नांवर चर्चा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा उद्योग मित्र समिती सभेची बैठक दि.20 मे रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीस इंडस्ट्रियल असोसिएशन, अक्कलकोट रोड MIDC व चिंचोली MIDC चे सदस्य व अधिकारी तसेच महापालिका अधिकारी उपस्थित होते.

यावेळी इंडस्ट्रियल असोसिएशनच्या वतीने औद्योगिक वसाहतींमध्ये पायाभूत सुविधांची कमतरता असल्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या समोर मुद्दे मांडण्यात आले. विशेषतः अक्कलकोट MIDC मध्ये पाणीपुरवठा, खराब रस्ते, ड्रेनेज लाईन आणि रस्त्यावरील लाईट या प्रमुख समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले.

तसेच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये टेक्स्टाईल शाखा सुरू करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. पाण्याच्या समस्ये संदर्भात महापालिका आयुक्तांच्या समवेत बैठक घेण्याबाबतही असोसिएशनने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन विनंती केली.

दरम्यान, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेन यांनी औद्योगिक वसाहतीमध्ये आवश्यक सुविधा पुरविणाऱ्या महापालिकेतील संबंधित अधिकाऱ्यांना सूचना करून येणाऱ्या अडचणींबाबत चर्चा केली.

MIDC मधील रस्त्यांच्या कामांसाठी शासनाकडून 75 टक्के, महापालिकेकडून 12.5 टक्के आणि उर्वरित 12.5 टक्के हिस्सा जिल्हा नियोजन व विकास समितीद्वारे उपलब्ध करून देण्यास सुकाणू समितीने मागील बैठकीत मान्यता दिली होती. याबाबत अंमलबजावणी लवकरात लवकर करण्याचे निर्देश देण्यात आले.

**अतिक्रमण काढण्याबाबत कडक कारवाईचे आदेश**

एमआयडीसी परिसरातील अतिक्रमण काढण्याबाबत सूचना देण्यात आल्या. अतिक्रमण करणारे आणि त्यांना मदत करणारे या दोघांवरही कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले.

**बैठक प्रत्येक महिन्याला घेण्याचे निर्देश**

तसेच जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक उमेशचंद्र दंडगव्हाळ यांना बैठक दर तीन महिन्यांनी न घेता प्रत्येक महिन्याला घेण्याबाबत सूचना देण्यात आली. प्रत्येक विभाग प्रमुखांनी एमआयडीसी संदभार्तील संबंधित अडचणींचा आढावा घेऊन पुढील पंधरा दिवसांच्या आत तो विषय बैठकीत मांडावा, अशा सूचना देण्यात आल्या.

यावेळी बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, पॉलीटेक्निक कॉलेज आर. व्ही. मुंडे, डायरेक्टर यंत्रमाग संघ नारायण आडकी, उपाध्यक्ष टेक्सटाईल फाउंडेशन सोलापूर जयंत श्री अकेन, जनसंपर्क अधिकारी टेक्स्टाईल फाउंडेशन सुजय निकते , इंडस्ट्रियल असोसिएशन सेक्रेटरी शिवशंकर आंधळकर, व्यवस्थापक सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन एस. बी. गायकवाड, एस.टी. राठोड प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी एस.टी. राठोड. उप अभियंता बी.पी. खंदारे, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालक ओंकार चौरे, जिल्हा विकास व्यवस्थापक नाबार्ड नितीन शेळके, जिल्हा उद्योग केंद्र राजशेखर शिंदे, सीनियर कन्सल्टंट पुणे श्रीजीत नायर, जी.डी बाबर खादी ग्रामोद्योग मंडळ आदी महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने भारताचे थोर नेते व माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्त कौन्सिल हॉल येथील महापौर यांच्या कार्यालयात भारताचे थोर नेते व माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेस उपायुक्त सोनाली यादव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, चंद्रकात दोतुल, जयप्रकाश आमनगी,सिद्धू तिमिगार, अशोक खडके, बाळू बळे, चेतन गदगे,आदी मान्यवर उपस्थित होते.

# इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी ३ ठिकाणी धाड, ९ सिलेंडर जप्त

## सांगलीत पालकमंत्र्यांच्या निर्देशानुसार फिरत्या पथकाची कारवाई



**सांगली (कटूसत्य वृत्त):-** सद्यस्थितीमध्ये आखाती देशांमध्ये सुरु असलेल्या युध्दाच्या तणावपूर्ण पार्श्वभूमिवर जिल्ह्यात एलपीजी सिलेंडर वितरण, इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्याकामी फिरत्या दक्षता पथकांचा पहारा ठेवण्यात येत आहे. या पथकांमार्फत 3 ठिकाणांवर धाड टाकून तपासणी करण्यात आली. या तपासणीमध्ये एकूण ९ सिलेंडर जप्त करण्यात आले असून, सदरील व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरु आहे.

सद्यस्थितीमध्ये आखाती देशांमध्ये सुरु असलेल्या युध्दाच्या तणावपूर्ण पार्श्वभूमिवर जिल्ह्यात एलपीजी सिलेंडर वितरण, इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्याकामी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण आणि संसदीय कार्य मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी यापूर्वीच निर्देश दिले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पुरवठा विभागामार्फत नियुक्त फिरत्या दक्षता पथकांनी घरगुती गॅस सिलिंडर अवैधरीत्या वापरणा ्यांवर निर्बंध लादण्यासाठी धाडींचे प्रमाण वाढवले आहे. त्याअंतर्गत ही कारवाई करण्यात आली.

घरगुती एलपीजी गॅसचे सुरळीत वितरण व्हावे तसेच घरगुती गॅसचा अवैध वापर रोखण्यासाठी जिल्हा स्तरावर दक्षता व फिरते पथक नियुक्त करण्यात आले आहे. गॅस एजन्सीकडून सिलिंडरचा गैरमार्गाने पुरवठा केल्याचे आढळल्यास अथवा घरगुती एलपीजीचा वापर व्यावसायिक कारणासाठी होत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.


# Classified - छोटी जाहीरात

## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

## बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

## पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

## वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंद्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) उमेदवाराचा आश्वासनांचा जाहीरनामा २) दुष्काळात प्रत्येकाला रोजगार मिळण्यासाठी शासन चालवत असलेली योजना-**** ** योजना ३) लाभ, उपयुक्त ४) नशीब (हिंदीत) ५) राहुल गांधी यांच्या बहिणीचे नाव ६) स्त्रियांना कपाळभर लावलेले कुंकू ७) येणाऱ्या काळात ११) गडबड, धांदल १२) भय, भीती (हिंदीत) १३) फटाक्यांची माळ १५) विमान उतरण्याची जागा १८) मुख्याध्यापक २०) हात, टॅक्स २१) बाहेरच्या विरूध्दार्थी २३) दुप्पट (इंग्रजीत) २४) मजबूत, कणखर २५) विचार, निर्धार (हिंदीत) २९) एक जगप्रसिध्द धरण कालवा ३०) सायकलचे चाक ३१) मत देण्याची क्रिया ३२) कामाचा मिळणारा आर्थिक मोबदला ३४) सलमान खानच्या बंधूचे नाव ३५) मराठी चित्रपटसृष्टीतील एक अभिनेता-*** भावे ३८) मनसे अध्यक्ष-** ठाकरे ३९) दु:ख (हिंदीत) ४०) कावळ्याचे ओरडणे **काव ४२) याच्या पिठापासून चपाती अथवा पोळी करतात

**आडवे शब्द :** १) खा. राहुल गांधी यांचे भाजपमध्ये असलेले चुलतबंधू २) आमदार असलेले पवारांचे नातू-*** पवार ५) पंकजा मुंडे यांच्या खासदार असलेल्या बहिणीचे नाव ७) एक हिंदी भाषिक न्यूज चॅनल ८) तीन गुणिले तीन ९) छ. शिवरायांना राज्याभिषेक करणारे धर्मगुरू-** भट्ट १०) गायीचे वासरू १३) छगन भुजबळ यांचे एक पुतणे १४) भारतीय क्रिकेट संघातील एक माजी खेळाडू -** शास्त्री १६) नाला १७) सासरच्या विरूध्दार्थी १९) पाकचा एक माजी फलंदाज-इंझमाम उल ** २१) दंगल चित्रपटातील प्रमुख अभिनेता २२) पुसटच्या विरूध्दार्थी २५) बिल्डिंग (मराठीत) २६) याच्यावर भाकरी भाजतात २७) णब उलट लिहा २८) बरोबर, योग्य २९) वास, गंध ३२) धनी ३३) दरवाजा ३४) उमेदवाराने डिपॉझिट म्हणून भरलेली रक्कम (मराठीत) ३५) मुलाची पत्नी ३६) कपडे धुण्याची प्रसिध्द पावडर ३७) रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ३८) क्रोध, संताप ४०) श्रवणेंद्रिय ४१) मेंढीपालन करणारा समाज, सरकारने यांच्या आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित ठेवला आहे ४३) वस्तूंची एकत्र केलेली जुळवाजुळव ४४) तूप (हिंदीत)

# सुडोकु - 256

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | 2 | | | 6 | | | |
| 7 | | | | | | 5 | 3 | |
| 5 | | 8 | | 3 | 7 | 1 | | |
| | | | | | | | 1 | 3 |
| | 1 | | 2 | 4 | | 6 | | 7 |
| 6 | | 3 | | | | 2 | | |
| | 7 | 1 | 6 | 2 | 9 | 3 | 4 | |
| | | 9 | 1 | 5 | 8 | | 2 | 6 |
| | | | | 7 | 4 | 8 | | 1 |

# आपच्या वतीने 'मोफत बैलगाडी प्रवास' आंदोलन




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** आप सोलापूर शहरच्या वतीने महागाई, इंधनदरवाढ आणि वाढत्या आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर शहरात 'मोफत बैलगाडी प्रवास' हे प्रतिकात्मक आंदोलन करण्यात आले.

आपचे सोलापूर शहर अध्यक्ष निलेश संगेपाग यांच्या नेतृत्वात सर्वसामान्य नागरिकांवर वाढत्या इंधनदरांचा आणि महागाईचा होत असलेला परिणाम अधोरेखित करण्यासाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले होते.

आंदोलनादरम्यान पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी बैलगाडीतून प्रवास करत केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणांविरोधात घोषणाबाजी केली. तसेच विविध आशयघन फलक हातात घेऊन सरकारकडे सर्वसामान्यांचा आवाज पोहचवण्याचा प्रयत्न केला .

'देशवासियांवर बैलगाडीची वेळ येण्याआधी सरकार जागं व्हा!', '12 वर्षे फायदा उद्योगपतींना– मग त्याग फक्त जनतेनेच का करायचा?', 'जनतेच्या खिशाला कात्री, उद्योगपती आणि नेत्यांना सवलती!', 'लोकांना सांगतात ब्रह्मज्ञान, स्वतः मात्र कोरडे पाषाण!', 'देशहित जपा, ट्रम्पसमोर झुकू नका!', 'जनतेला सल्ले नकोत, दिलासा हवा!' आणि 'जनतेला त्यागाची भाषा, सत्ताधाऱ्यांना सुखाची व्यवस्था!' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

सरकारकडून नागरिकांना काटकसरीचे सल्ले दिले जात असताना दुसरीकडे वाढती महागाई, इंधनदर आणि जीवनावश्यक वस्तूंचे वाढलेले दर यामुळे सामान्य जनतेचे जगणे कठीण झाल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. गेल्या अनेक वर्षांमध्ये मोठ्या उद्योगपतींना विविध सवलती देण्यात आल्या, मात्र सामान्य माणसालाच त्याग करण्यास सांगितले जात असल्याची टीकाही यावेळी करण्यात आली.

देश आधुनिकतेकडे जात असल्याचा दावा केला जात असताना आज सामान्य नागरिकांवर पुन्हा बैलगाडीची वेळ येत असल्याची भावना जनतेमध्ये निर्माण झाली आहे. याच संताप आणि वेदनांना वाचा फोडण्यासाठी हे आंदोलन करण्यात आल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

यावेळी शहर अध्यक्ष निलेश संगेपाग यांनी आधीच आपल्या सरकारने प्रत्बिंधत्मक उपाययोजना करण्यास विलंब केला देशहिताच्या ऐवजी निवडणुकांना प्राधान्य दिले ज्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे आता आणखीन विलंब न करता देशहितासाठी मोदीजींनी त्यांची 56 इंच ची छाती ट्रम्प यांना दाखवून द्यावं आणि देशहितासाठी कठोर ठाम भूमिका घ्यावी आजवर अनेक उद्योगपतींना सरकारने दिलासा दिलेला आहे आता फक्त जनतेलाचा त्याग करायला भाग पाडू नका तर उद्योगपतींना आणि नेत्यांना हि त्याग करायला भाग पाडा असे मत व्यक्त केले.

आणि माजी शहर उपाध्यक्ष श्रीकांत वाघमारे यांनी मोदीजींनी ढट केअर फंड आता देशासाठी वापरावे तसेच भाजप पक्षाचे 10 हजार कोटी देखील देशासाठी वापरावे असे मत व्यक्त केले.

हे आंदोलन शहर अध्यक्ष निलेश संगेपाग यांच्या नेतृत्वात झाले तसेच जिल्हाध्यक्ष एम पाटील, माजी शहर उपाध्यक्ष श्रीकांत वाघमारे, जिल्हा उपाध्यक्ष प्राजक्त चांदणे, मल्लिकार्जुन पिलगेरी, सुचित्रा वाघमारे, रहीम शेख, रॉबर्ट गौडर, बसवराज सारंगमठ, मदणी चाचा, प्रसाद बाबानगरे, व इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# दिड वर्षात कुकडी व दहिगाव प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना ३२ कोटी रुपये मिळवून दिले- आ. नारायण पाटील



**करमाळा, (कटूसत्य वृत्त):–** करमाळा तालुक्यातील दहिगाव उपसा सिंचन योजना व कुकडी प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांनी आपल्या जमीनी दिल्या आहेत अशा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना आपण भुभाडे, अंतिम निवाडा, भुसंपादन आणि पिक नुकसान भरपाईपोटी आता पर्यंत ३२ कोटी २ लक्ष १५ हजार रुपये निधीची तरतूद करण्यात यशस्वी ठरलो असल्याचे आमदार नारायण आबा पाटील यांनी सांगितले आहे. याबाबत अधिक सविस्तरपणे माहिती देताना आमदार नारायण आबा पाटील यांनी सांगितले की, करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांनी कुकडी प्रकल्पासाठी आपल्या जमीनीवर चारी खोदकाम करुन दिले परंतु प्रत्यक्षात त्यांना भुभाडे अथवा भुसंपादनाचे पैसे दिले गेले नव्हते. सन २०१४ ते २०१९ या माज्या पहिल्या टर्म मध्ये हि बाब आपण अधिवेशनात मांडली व यानंतर सदर पाच वर्षात भुभाडे पोटी शेतकऱ्यांना आर्थिक रक्कम देण्यास सुरुवात झाली. आता आपण आमदार पदाची सुत्रे हाती घेतल्यानंतर सन २०२४–२५ या वर्षात कुकडी भुभाडे व संपादन पोटी १९ कोटी ३६ लाख रुपये तर सन २०२५–२६ या वर्षात १० कोटी ४६ लाख रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग केले आहेत. तर दहिगाव उपसा सिंचन योजनेच्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना पीडीएन क्षेत्रातील पिकांकरीता, पिक नुकसान भरपाईपोटी व बंदिस्त नलिका वितरण प्रणाली भुभाडे यापोटी 2024–25 रु.49 लक्ष (कुंभेज,गुळसडी, निंभोरे, शेलगाव (क),घोटी, सौंदे, सालसे) तर 2024–25 रु 30 लक्ष नुकसान भरपाई म्हणून पीडीएन क्षेत्रातील पिका करिता (सौंदे, सरपडोह, वरकटणे, सालसे, घोटी ,मलवडी) तसेच 2025–26 रु.107 लक्ष साडे गाव अंतिम निवाडा कामी ॲडव्हान्स व 2025–26 मध्ये मौजे निंभोरे करीता रु.17 लक्ष खरेदीसाठी रक्कम वितरीत करण्यात आली. 2025–26 मध्ये मौजे सौंदे पीक नुकसानभरपाई तसेच बंदिस्त नलिका वितरण प्रणाली भुभाडे म्हणून रुपये १७ लक्ष १५ हजार देण्यात आले आहेत. तसेच उर्वरित प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सुद्धा जमिनीचे भाडे, मोबदला, पिक नुकसान भरपाई या वर्गात समाविष्ट असलेल्या बाबी प्रमाणे रक्कम दिली जाणार असल्याचे आमदार नारायण आबा पाटील यांनी सांगितले.

# बार्शीत 'जलतारा प्रकल्प' प्रात्यक्षिक कार्यक्रम उत्साहात संपन्न



**बार्शी (कटूसत्य वृत्त):–** जलसंधारण, भूजल पातळीत वाढ व पावसाच्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने, कृषी विभाग बार्शी व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे कृषी महाविद्यालय बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला 'जलतारा प्रकल्प' हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती, तर प्रमुख पाहुणे म्हणून तालुका कृषी अधिकारी संतोष कोयले उपस्थित होते. हा कार्यक्रम शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, सचिव पी. टी. पाटील, सहसचिव अरुण देबडवार आणि खजिनदार जयकुमार शितोळे यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी कृषी अधिकारी गणेश पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. बी. शिंदे, कार्यालयीन अधीक्षक मोरे टी. एस. आणि राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. संतोष शेंडे यांची सन्माननीय उपस्थिती होती.

तसेच कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, इतर कर्मचारी आणि प्रथम व द्वितीय वषातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना 'जलतारा शेतखड्डा' या संकल्पनेचे महत्त्व सविस्तरपणे समजावून सांगताना, पावसाचे वाहून जाणारे पाणी जमिनीत मुरवून भूजल पातळी वाढविणे, मृदा धूप रोखणे तसेच शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढविणे यासाठी हा जलतारा शेतखड्डा कसा उपयुक्त आहे, याविषयी बहुमूल्य मार्गदर्शन केले.

केवळ सैद्धांतिक माहिती न देता, महाविद्यालयाच्या परिसरामध्ये मान्यवर, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी स्वतः उत्स्फूर्तपणे श्रमदान केले. यावेळी जेसीबीच्या मदतीने ५ फूट लांब, ५ फूट रुंद आणि ६ फूट खोल शोषखड्डा घेण्यात आला. त्यानंतर शास्त्रीय पद्धतीने त्यामध्ये पाषाणाचे काळे दगड ५.५ फूट उंचीपर्यंत रचून हा खड्डा पूर्णपणे भरून घेण्यात आला. या संकल्पनेनुसार, ७०० मिमी पाऊस पडल्यास अशा एका खड्ड्याद्वारे सुमारे ३ लाख ४० हजार लिटर पाणी जमिनीमध्ये मुरते, अशी तांत्रिक माहिती यावेळी प्रात्यक्षिकादरम्यान देण्यात आली.

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात अत्यंत उत्साहाने भाग घेतला आणि प्रत्यक्ष प्रात्यक्षिकादरम्यान जलसंधारणाविषयी विविध नावीन्यपूर्ण प्रश्न विचारत आपली जिज्ञासा व्यक्त केली, ज्याचे उपस्थित तज्ज्ञांनी योग्य निरसन केले.

अखेर कृषी महाविद्यालय व तालुका कृषी विभाग यांच्या संयुक्त सहकार्याने, तसेच सर्वांच्या विशेष परिश्रमाने हा महत्त्वपूर्ण व पर्यावरणपूरक उपक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

# वैराग पोलिसांची मोठी कारवाई:
## प्रतिबंधित गुटखा व पानमसाला जप्त



**वैराग (कटूसत्य वृत्त):–** वैराग पोलिसांनी भातंभरे परिसरात कारवाई करत एका दुचाकीवरून वाहतूक होत असलेला प्रतिबंधित गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू व सुपारीचा मोठा साठा जप्त केला. या कारवाईत एकूण १,१८,३३० किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

दि. २१ मे २०२६ रोजी सकाळी ९:२५ वाजता पोलिस पेट्रोलिंगदरम्यान शेख हसिफ अल्लाउद्दीन (रा. आंबेहोळ, जि. धाराशिव) याच्याकडून हिरो स्प्लेंडर (MH-25 AU-7366) या दुचाकीवरून बेकायदेशीर वाहतूक होत असल्याचे आढळले. पोलिसांनी पंचांसमक्ष १२ गोण्या जप्त करून पुढील तपासासाठी अन्न व औषध प्रशासनाला माहिती दिली.

अन्न सुरक्षा अधिकारी रामानंद स्वामी यांनी वैराग पोलीस ठाण्यात जाऊन तपासणी केली असता जप्त मालामध्ये विविध प्रकारचे गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखू असल्याचे निष्पन्न झाले. यामध्ये विमल पानमसाला, बादशाह गुटखा, KR-1000 गुटखा, जाफरानी जर्दा आदी प्रतिबंधित पदार्थांचा समावेश आहे.

जप्त मुद्देमालाची किंमत ७८,३३० असून वाहतुकीसाठी वापरलेली दुचाकी अंदाजे ४०,००० किमतीची आहे. अशा प्रकारे एकूण १.१८330 लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी महाराष्ट्र शासनाच्या प्रतिबंधात्मक अधिसूचनेचे उल्लंघन केल्याप्रकरणी अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ तसेच भारतीय न्याय संहितेतील विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात येणार असून पुरवठादार व साठा मालकांचा पुढील तपास सुरू आहे. हे कारवाई पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली व डी.बी. बदकातील पोलीस उपनिरीक्षक प्रतापसिंह जाधव पोलीस कॉन्स्टेबल आकाश पवार पोलीस कॉन्स्टेबल राहुल पाटील यांनी केली.

# संभाजी आरमारचा वज्रमुठ मेळावा शुक्रवारी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** संभाजी आरमार यांच्या वतीने शुक्रवार, दि. २२ मे २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता "वज्रमुठ मेळावा" आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा सोलापुरातील वोरोनोको प्रशाला मैदान येथे पार पडणार असून कार्यक्रमासाठी विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या मेळाव्याच्या माध्यमातून संघटनात्मक ताकद आणि सामाजिक एकजूट दाखविण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमाच्या तयारीला वेग आला असून मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते व नागरिक उपस्थित राहतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

मेळाव्यास सोलापूर शहर व जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,

असे आवाहन संभाजी आरमारच्या वतीने करण्यात आले आहे.

# सैनिकी मुलांचे वसतिगृह, सोलापूर येथे अधिक्षक पदांची भरती

**सोलापूर,(कटूसत्य वृत्त):–** जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांच्या अधिपत्याखालील सैनिकी मुलांचे वसतिगृह, सोलापूर येथे अशासकीय सहाय्यक वसतिगृह अधिक्षक पदाची भरती करण्यात येणार आहे. सहाय्यक वसतिगृह अधिक्षकाचे एक पद भरावयाचे असून निवड झालेल्या उमेदवारास प्रतिमहा रुपये २४ हजार ८७५ इतके मानधन देण्यात येणार आहे. संबंधित उमेदवार हा सैन्यदलातील किमान हवलदार पदावरून सेवानिवृत्त असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारास मराठी व इंग्रजी टंकलेखनासह संगणक हाताळणीचे ज्ञान असणे बंधनकारक आहे.

सोलापूर जिल्ह्यातील पात्र माजी सैनिकांनी आपले अर्ज, सैनिक सेवेची कागदपत्रे तसेच इतर शैक्षणिक कागदपत्रांसह दिनांक २९ मे २०२६ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात जमा करावेत.

प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने दिनांक २ जून २०२६ रोजी (मंगळवार) सकाळी १०.०० वाजता मुलाखती घेण्यात येणार आहेत. उमेदवारांनी मुलाखतीस उपस्थित राहताना सर्व मूळ कागदपत्रे सोबत आणावीत.

सोलापूर जिल्ह्यातील पात्र व इच्छुक माजी सैनिकांनी या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर मिलिंद तुंगार यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

# राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पुनर्वसन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** भारतीय जैन संघटना (बीजेएस) महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुला–मुलींच्या शैक्षणिक पुनर्वसनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आणि संवेदनशील उपक्रम संस्थापक अध्यक्ष शांतीलालजी मुथा याच्या मार्गदर्शना खाली राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना पुणे येथील वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पामध्ये प्रवेश देऊन त्यांचे शिक्षण, निवास, भोजन, ड्रेस, शैक्षणिक साहित्य तसेच इतर आवश्यक सुविधा पूर्णतः विनामूल्य उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

मागील दोन वर्षात आत्महत्या झालेल्या शेतकरी कुटुंबातील इयत्ता पाचवी, सहावी व सातवीमध्ये आता प्रवेश घेत असलेल्या मुला–मुलींना या प्रकल्पात प्रवेश देण्यात येणार असून त्यांचे बारावीपर्यंतचे संपूर्ण शिक्षण भारतीय जैन संघटनेमार्फत विनामूल्य करण्यात येणार आहे.

यासाठी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांकडून आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील पात्र विद्यार्थ्यांची माहिती प्राप्त करण्यात आली आहे. भारतीय जैन संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व सेवक संबंधित कुटुंबांच्या घरी गावातील सरपंच किंवा प्रतिष्ठीत व्यक्ती सोबत घेऊन जाऊन प्रत्यक्ष भेट घेणार असून विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना या योजनेची सविस्तर माहिती व्हिडिओ व छायाचित्रांच्या माध्यमातून समजावून सांगण्यात येणार आहे.

घरातील कर्ता शेतकरी आत्महत्या केल्यानंतर संपूर्ण कुटुंब मानसिक, सामाजिक व आर्थिक संकटात सापडलेला असतो, अशा कठीण परिस्थितीतही मुला–मुलींचे शिक्षण थांबता कामा नये, त्यांनी शिक्षण घेऊन भविष्यात स्वतःच्या कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे उचलली पाहिजे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे भारतीय जैन संघटनेचे राज्य अध्यक्ष केतनभाई शहा यांनी सांगितले. इच्छुक व गरजू आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांनी या शैक्षणिक पुनर्वसन उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

आपल्या गावात असे कोणी कुटुंब असेल तर त्यांनी सोलापूर जिल्ह्या साठी रविभाई गांधी,जेऊर मोबाईल नम्बर 9689557544 यांच्याशी संपर्क साधावा.

# लाडकी बहीण योजनेचे केवायसी प्रक्रिया बंद, अफवांवर विश्वास ठेवू नये



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोशल मीडियावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या ई केवायसी महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय येथे सुरू असल्याच्या अफवेमुळे नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती त्यामुळे आज संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना भेट घेऊन प्रत्यक्ष माहिती घेऊन परिस्थिती जाणून घेतली तरी नागरिकांनी अफवावर विश्वास ठेवून या कार्यालयात गर्दी करू नये असे आवाहन संभाजी ब्रिगेडचे वतीने करण्यात आले.

सात रस्ता येतील जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामध्ये या योजनेच्या लाभार्थी महिलांमध्ये संभ्रम निर्माण होऊन या ठिकाणी शहर व तालुक्यातील असंख्य महिला गर्दी करीत होत्या त्याचबरोबर तेथील झेरॉक्स दुकानदार तीन रुपये चा केवायसी फॉर्म 25 रुपयाला विक्री करताना आढळून आले प्रत्यक्षात त्या कार्यालयामध्ये दोन पोर्टल सुरू असून त्या पोर्टलवर केवायसी केले आहे का हे चेक करण्याचे काम सुरू आहे शासनाने अडीच लाखाच्या वर उत्पन्न असेल किंवा सरकारी नोकरदार असेल ज्यांच्याकडे चार चाकी वाहन आहे व एकाच घरातील फक्त दोन महिलांना या मुख्यमंत्री लाडकी बहिणी योजनेचा लाभ बंद करण्यात आल्याचे दाखवत आहे हे सुद्धा तेथे चेक करून सांगण्यात येत होते

जिल्हा महिला व बालकल्याण समिती कार्यालय सात रस्त्याला एका सोसायटीमध्ये भाड्याने असून ते नागरिकांच्या गैरसोयीचा आहे त्यामुळे हे कार्यालय जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये हलवण्याची मागणी संभाजी ब्रिगेडच्या

वतीने जिल्हाधिकारी यांना करण्यात येणार आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे मा. पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अन कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले महिला आघाडीचे जिल्हाध्यक्ष मीनलताई दास जिल्हा उपाध्यक्ष मनीषा कोळी उत्तर तालुका प्रमुख विक्रम वानकर जिल्हा संघटक विशाल साळुंखे आदी उपस्थित होते.

# विराट स्पोर्ट्स करिअर अकॅडमीच्यावतीने नूतन पोलिसांचा सत्कार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** नेहरूनगर येथील विराट स्पोर्ट्स करिअर अकॅडमी यांच्यावतीने आज गुरुवार दि.21 मे 2026 रोजी नूतन पोलीसांचा सत्कार उत्साहात संपन्न झाला.

यावेळी प्रमुख अतिथी माजी नगरसेवक भीमाशंकर म्हेत्रे, क्रीडा मार्गदर्शक सुभाष माने, उद्योजक सतीश बुरुडकर, समाज कल्याण अधिकारी शांताराम शिंदे यांच्या शुभहस्ते शाल, फेटा बांधून व पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झालेले योगेश्वर पांचाळ, युवराज गवळी व हरिश गंगदे तसेच पोलीस शिपाई म्हणून भरती झालेले सोहेल मुल्ला, साहिल शेख, अल्ताफ सय्यद, अमरनाथ गोटे, श्रीनिवास धायगुडे यांचा वरील मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला यावेळी प्रमुख अतिथी भीमाशंकर म्हेत्रे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

तसेच क्रीडा मार्गदर्शक सुभाष माने यांनी अकॅडमीच्या कायार्चे कौतुक केले.

जॉगर्स असोसिएशनचे माजी अध्यक्ष संतोष कदम, न्यू जॉगर्स असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप कदम, सोलापूर जॉगर्स असोसिएशनचे अध्यक्ष हेमंत जाधव,.रेल्वे अधिकारी निलेश वरवडकर,भाजप क्रीडा प्रकोष्ट यशवंत पाथरूट, क्रीडा पत्रकार अजित संगवे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक व राष्ट्रीय खेळाडू सूयार्जी लिंगडे व अकॅडमीच्या संचालिका व मुख्य प्रशिक्षक भारती लिंगडे यांचा सत्कार करण्यात आला कार्यक्रमानंतर सर्व उपस्थित खेळाडू व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण अतिशय विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी बहुसंख्य प्रशिक्षणार्थी व नागरिक उपस्थित होते.

# महापालिका तर्फे 'दहशतवाद विरोधी दिन' पाळण्यात आला



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर महानगरपालिका तर्फे दि. २१ मे रोजी 'दहशतवाद विरोधी दिन' पाळण्यात आला. भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षी २१ मे रोजी हा दिवस पाळला जातो. दहशतवादाच्या धोक्याबाबत समाजात जनजागृती निर्माण करणे तसेच शांतता, मानवता आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. याच पार्श्वभूमीवर आयोजित कार्यक्रमात महानगरपालिकेच्या सर्व विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांनी सहभागी होत दहशतवादाचा निषेध व्यक्त केला. यावेळी उपस्थित सर्वांनी देशामध्ये शांतता टिकवून ठेवण्यासाठी तसेच दहशतवादी विचारसरणीच्या विरोधात ठामपणे उभे राहण्याची 'दहशतवाद विरोधी प्रतिज्ञा' घेतली.

सदर कार्यक्रम अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी नियंत्रण अधिकारी तपन डंके, लाईट विभाग प्रमुख परदेशी, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, संगणक विभाग प्रमुख मतीन सय्यद यांच्यासह महानगरपालिकेचे इतर सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमाद्वारे सोलापूर महानगरपालिका च्या वतीने देशाची एकता, अखंडता आणि सामाजिक सौहार्द अबाधित राखण्यासाठी कटिबद्ध असल्याचा संदेश देण्यात आला.

# अनगरच्या पाटील विद्यालयाच्या माजी विद्यार्थीनीची मुंबई पोलीसपदी निवड



**अनगर (कटूसत्य वृत्त):–** कै. शंकरराव बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची माजी विद्यार्थीनी कु. तेजस्विनी बाबूराव वसेकर हिची मुंबई पोलीस दलात निवड झाल्याबद्दल विद्यालयात तिचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत ढोले यांच्या हस्ते सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी प्राचार्य महादेव चोपडे, उपप्राचार्य माधव खरात, पर्यवेक्षक राजेंद्र डोके यांच्यासह रमेश चव्हाण, सत्यवान कांबळे, उज्वला घोलप, माधवी पाचपुंड, अनुपमा वरवटकर, ज्योती भडकवाड, दाजी गुंड, पांडुरंग शिंदे, सत्यवान दाढे, बापूराव घुले, डॉ. प्रशांत कुलकर्णी, सोमनाथ ढोले आणि झाकीर मुलानी उपस्थित होते. तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कु. तेजस्विनी वसेकर हिने जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर मुंबई पोलीस दलात स्थान मिळवून विद्यालयाचा गौरव वाढविला आहे. तिच्या यशामुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.